प्रकरण चौथे

'बनगरवाडी'ची भाषाशैली

प्रकरण चौथे

"बनगरवाडी" कादंबरीची भाषाशैली

१९३५-४० च्या दरम्यान मराठी कादंबरीने एक नवा उन्मेष पाहिला तो म्हणजे "प्रादेशिक कादंबरी", १९५५ पर्यंत या प्रादेशिक कादंबरीने व ग्रामीण साहित्याने बरीच वाटचाल केली. ग्रामीण कथा, कादंबरी, प्रादेशिक कादंबरीचे लेखन विपुल झाले. परंतु ग्रामीण भाषा, प्रादेशिक बोलीचा वापर मात्र फक्त संवादापुरताच मर्यादितपणे केला गेला. याचे कारण या कादंबरीचे लेखन प्रामुख्याने कादंबरीकार हे कथानक सांगत आहे अशा पध्दतीचे असल्याने, तसेच हे सर्व लेखक ब्राम्हण वर्गातील, पांढरपेशा समाजातील होते. त्यांची भाषा केवळ नागरीच होती. त्यांनी ग्रामीण जीवनात जरी जन्म घेतला असला तरी त्यांची "नाळ" ग्रामीण जीवनाशी कधीच तुटलेली होती. त्या जीवनाचा, तिथल्या मातीचा त्यांना स्पर्श फारसा झालेलाच नव्हता. तेव्हा आपण ग्रामीण, प्रादेशिक लिहितोय म्हणून (जाणीवपूर्वक) वातावरण निर्मितीसाठी संवादापुरतीच कृत्रिम ग्रामीण/प्रादेशिकबोली वापरायला त्यांनी सुरुवात केली. पेंडसे, दांडेकर, र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ यांच्या कादंब-या वाचल्यास या कृत्रिम ग्रामीण/प्रादेशिक बोलीचा प्रत्यय आपणास येतो. उदा. "गारंबीचा बापू"मधील संवाद पहाण्यासारखा आहे.

"भारीसा माजला आहेस रे ?"
"माजला काय याच्यात ? चहा पितोय मी "
"बाजूला बसून नाही पिता येत ? का आयशीन सांगितलं म्हणून ?"
"मग नीट सांग ना. बकोट काय धरत्येस ?"

. . . .

"आज कुठं जायचं आहे ?"

"मसणात. उठ तूं तिथनं --"

"रोज रोज बाहेर काय असतं ग तुझं आई ?" (पृ.२२)

या संवादातील भाषा पूर्णत: प्रादेशिक वा ग्रामीणही नाही. या संवादातून शारीरिक हावभाव व्यक्तीची बोलण्याची ढब, शब्दाची फेक, दिसत नाही. तसेच हे संवाद जीवनानुभूतीचा प्रत्यय देत नाहीत. या संवादातून व्यक्तीचे वय, धंदा, जात, स्वभावविशेष ही दिसून येत नाही. म्हणूनच व्यंक्टेश माडगूळकरांच्या पर्यंत ख-या अर्थाने प्रादेशिक बोलीचा समर्थ वापर कुणी केलेला दिसत नाही. १९५५ पूर्वी माडगूळकरांनी आपल्या कथा-तून (उदा. "माणदेशी माणसं" काळयावरती पांढरे, जांबळाचे दिवस, इ. कथासंग्रह) ख-या अर्थाने ग्रामीण/प्रादेशिक बोलीचा वापर सुरु केला व "बनगरवाडी" या प्रादेशिक कादंबरीत संवादात वापरलेली भाषा ही ख-या अर्थाने प्रादेशिक वैशिष्टय दाखविणारी, स्वभावाचे, मन:पिंडाचे विशेष दाखविणारी, व्यक्तीची जात, वय, लिंग, यांचा प्रत्यय देणारी भाषा आहे, तशी पेंडसे, दिघे, यांच्या कादंब-यातून दिसत नाही म्हणूनच डॉ. मदन कुलकर्णी लिहितात -"श्री पेंडसे यांच्या कादंब-यातील संवाद असेच नैसर्गिक असतात. त्यांचे स्वरूप आशयधन असते. त्यांच्या "एल्गार", "गारंबीचा बापू" व "रथचक्र" या कादंब-यामधून असे काही गतिमान व कलात्मक संवाद शोधून दाखविता येतील. परंतु अशा कलात्मक संवादाच्या जोडीला याच कादंब-यामधून बनावट संवादाचे हीण मिसळलेले आढळते. उदा. "एल्गार" मधला खेडयातील अर्धशिक्षित, धर्मवेडा कादर मृत्यू शय्येवर असताना रघूशी जे बोलतो ती भाषा कादरची नसून लेखकाची वाटते... "गारंबीचा बापू" मध्ये उत्तरार्धातील "राधा-बापू", "राधा-दिनकर" यांच्यातील संवाद कृत्रिम वाटतात."[१]

म्हणूनच प्रादेशिक कादंबरीतील संवाद भाषा, ख-या अर्थाने प्रादेशिक वैशिष्टय दाखविणारी माडगूळकरांनी पहिल्यांदा "बनगरवाडीत"च वापरली असे म्हणता येईल. अर्थात ही प्रादेशिक भाषा वाचकासमोर नवे जीवन व प्रादेशिक समस्यांची चित्रणे करताना साहिजिकच त्या जीवनाशी संबध्द भाषेचा वापर करावा लागतो. माडगूळकरांनी "बनगरवाडी"त धनगरांचे जीवनचित्रण करताना साहजिकच धनगरांचे बोलणे, बालटयाचे अरेरावी बोलणे, कारभा-याचे मवाळ बोलणे, नानीचे, अंजीचे स्त्रीसुलभ बोलणे, बोलताना त्यांचे होणारे शारीरिक हावभाव, शब्दोच्चारातील लय, व धनगरी पेशातील वा त्या परिसरातील वाक्प्रचार, म्हणी, विशेष/खास शब्द यांच्यातून तो प्रदेश ज्या धनगराचा आहे तो तिथल्या मातीच्या गंधासह प्रकट केला आहे.

भाषेच्याद्वारा स्वभाववैशिष्टयांचा आविष्कार-बालटया हा मुळातच थोडंफार सरकारी दरबारी वजन असलेला गावावर दाब ठेऊन असणारा. त्याच्या या प्रतिमेला धक्का बसतो तो मास्तरामुळेच म्हणून सुरूवातीला तो मास्तरला

"काय अंडीवालाहा हायेस का गा ?"[२] म्हणून हेटाळणी करतो. व "मी मास्तर आहे" [३] असे म्हणताच त्याचा अहंकार जागा होतो. मास्तर या जमाती बद्दलची त्याची चीड माडगूळकर पुढील संवादातून सहजतेने दाखवितात.

"हं, हतं काय करायचा गा मास्तर ? साळा चालतीय कुठं हतं ? पोरं हायती कुटं वाडीत ? सरकारला काय ठावं न्हाई ? रिक्कामा फाजीलपणा..."[४]

शाळा शिकल्याने, मास्तर आल्याने लोक शहाणे होतील व आपला आब जाईल यासाठी तो कारभा-याला अंजीमास्तर चोळी प्रकरण खुलवून सांगतो. शेवटी गाव सोडतानाही त्याचा पीळ जात नाही तो म्हणतो--

"मास्तर, मी चाललो. पर जगून माघारी ईन आन् तुजं बघीन. अरं, मला पक्कं माहीत हाय तू माझं हात पाय मोडलंस।"[५]

यातील "अरं-तुरं"ची भाषा बालटयाचा स्वभाव सहज व्यक्त करते. उलट कारभारी म्वाळ, गावाला सांभाळणारा म्हणून त्याची भाषापण म्वाळ चुकले मैटरु न्याहाळावे तसे न्याहाळून कारभारी म्हणतो.

"हतं का बसला रे बाळा ?"[६]

यातून त्याची बोलण्याची ढब, माणसाला न्याहाळण्याची पध्दत, मुलं, धनगर, वाडी बदलचा जिव्हाळा त्याच्या शब्दाशब्दातून दिसतो. पंत सरकारने नुसते "पाटील" म्हटले तर हा म्हातारा मोहरून जातो. जीवनाची धन्यता त्याला वाटते. हाच म्हातारा मरणाची भाषा बोलू लागताच शेकू म्हणतो "नाना, मरायला काय धाड झालिया तुला ? अजून पाच वर्ष ढंग न्हाइ तुला- जा घरी"[७] या शेकूच्या बोलण्यातील "धाड झालिया" "ढंग न्हाई तुला" या शब्द कळा त्या मातीचा गुण घेऊन प्रगटल्या ही अस्सल शब्द कळा फक्त माडगूळकरच लिहू जावोत.

नानी ही स्त्री असूनही पुरुषी सामथ्र्याने धटलेल्या पेरणीला स्वत: बैल होऊन तोंड देते. पण आपला नवरा (शेकू) एका परस्त्रीच्या कबजात गेलेला पाहून मोठया धूर्तपणे संयमीपणे ती आपली व्यथा मास्तरला सांगते. ती भुईकडे नजर लावून म्हणते "मान सांगावा लोकाला, अपमान ठिवावा आपल्याशी,"[८] यातून तिची बोलण्याची ढब, मान न वर करताच बोलणे, व जीवनातील सत्य ती सहजपणे बोलून दाखविते. "जनाची न्हाई, मनाची तरी लाज" आपल्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

पतीने धरावी ही स्त्री सुलभ भावना व शेवटी नव-याच्या वागण्याला वैतागून वेगळे राहणे व "मास्तर, आलं आमचं खुळं माघारी !"[९] म्हणून मोठ्या आनंदाने हा निरोप मास्तराना सांगायला येणे. याच्यातून नानीचे धीरोदत्त मन गाजर, शेंगा मास्तरला देऊन तिने मास्तराबद्दलचा व्यक्त केलेला जिव्हाळा माडगूळकर तिच्या संवादातून सहजतेने व्यक्त करतात. म्हणूनच ही धनगर स्त्री वाचकाला अंत:र्मुख बनविते.

जगन्या रामोशी हा खालच्या जातीचा त्याने वांग्याची बाई काढून आणली, वरच्या पायरीला हात घातला तेव्हा वांगीचे लोक येऊन दम देऊ लागले. तेव्हा मास्तर, 'वांगी' - 'बनगरवाडीचे लोक यांच्यांतील लोकभावनांचा क्षोभ माडगूळकर मोठ्या ताकदीने प्रकट करतात. उदा. माझ्या छातीला छाती लावून उभा राहिलेला गडी इकडे तिकडे बघुन थोडा सैल झाला. नाक फुगवून म्हणाला.

"आमाला जगन्या रामुशी पायजे."

मी म्हणालो,

" तो चारदोन दिवस झाले गावात नाही."

"कशावरनं खरं हे ?"

"मी सांगतोय म्हणून"

"बरीच रग हाय की रं शाळा मास्तरा तुज्या अंगात !"

एवढयात एक म्हातारी येते व म्हणते.

"अरं माज्या लेकरा, गरीब रामोश्यावर काय कु-हाड चालवतोस ? छप्पन कुळीचा म्हराटा तू रामोशी तुज्या पायातलं चेंडू - आं ? नीट बैस. उन्हाचा आलास. पानी पी. काम धाम असलं तर हया मास्तराला पूस."[१०]

एका रामोश्याने बाई काढून नेऊन आमच्यातोंडाला काळ पुसलं. ही वांगीच्या मराठयांची भावना व जगन्यानं वाकडं पाऊल टाकून गावाला काळींबा लावला म्हणून आनंदा रामोशी म्हणतो --

"रामुशाचं बीज सांगनार न्हाई. मसनात जाऊं द्या त्येला मास्तर, मागावर जाऊन आणतो का न्हाई बगा!"[११]

या संवादातून लोकभावनेचा उद्रेग माडगूळकर किती सहजतेने व्यक्त करतात. ही त्यांच्या भाषेचीच किमया आहे. कारण माडगूळकर ही भाषा जगले आहेत. आयबु हा गरीब, मास्तरांचा सोबती. प्रसंगी मास्तरांसाठी बालटयाला मारणारा, पावसात भिजलेल्या कुत्र्यासारखा मास्तरला म्हणतो --

"मला कुणी नाही. पोटामागं गावागाव हिंडतो. आज हितं आलो शाळंपुढं लोकांनी सांगितलं. मास्तर हाय एकलाच जा त्येच्या सोबतीला आलो!"[१२] असे तुटक बोलणारा गरीब आयुब, तितकाच हुषारही आहे. म्हणूनच मास्तरला बैल मागणाऱ्या शेकूला तो म्हणतो --

"तू येडा काय रे शेकू ? मास्तरापाशी बैल कुठला ? ते काय शेतकरी का हेडे ? उगाच काहीबी मागायला याचं ? जा घरी!"[१३]

हाच आयबु मास्तरांना बिऱ्हाड करण्याविषयी सांगतो. या आयबुचे भावविश्व वर्णन करताना जेव्हा तो तालमीवरुन पडून झोपून असतो व राजा येऊन गेल्याचे कळताच तो खोल आवाजात म्हणतो.

"मास्तर, राजा आला का ?"
"अरे आला. येऊन गेला सुध्दा. तुला काय झालं ? कसा पडलास"

"राजा आला-- आमाला बघायला न्हाई मिळाला."[१४]

केवळ राजाचे दर्शन घडले नाही यामुळे व्याकुळ होणारा आयबु मास्तराना निरोप देतानाही तेवढाच व्याकुळ होतो. मास्तर त्याला परत जा म्हणतात तेव्हा आयबू म्हणतो —

"हे गबाळं तुमच्या घरी टाकून मग मी माघारा जाईन."[१५]
आयबूच्या दृष्टीने राजा, मास्तर दोघे देवच.!

तसाच काकुबा, मातृभूमी, तिचे प्रेम हे माहीत नसणारा पण दुष्काळात त्याचा जीवनाचा लोभ संपून गेला तरी पांढरीवरला व मेंढरावरला लोभ संपला नाही. त्याची ही श्रध्दाळू भावना त्याच्या पुढील शब्दातून दिसून येते.

"सगळी मेंढरं नेतोस, मग मी हितं काय करू ? दोन ठिऊन जा. माज्या भाकरीतली त्यांना घालून जतन करीन. निभना झालं तर सगळीच मरून जाऊ!"

या उद्गारात काकुबाची श्रध्दा तर दिसून येतेच पण त्याचा स्वभाव, त्याचे मेंढरावरील प्रेमही दिसून येते.

उलट कारभारी झाड देण्यासाठी बाळा धनगराला विनंती करतो तेव्हा तो म्हणतो--"मी कुणाचं ऐकणार न्हाई. तुम्ही लोक मला मातीत घालाल. मी तालमीला बळ देणार नाही. झाड देणार न्हाई. मग काय होणार ते होईल!"

तेव्हा कारभारी म्हणतो "तू उगीच उतू जाऊ नगस बाळा..." इथे दूध उतू जाणे व माणसाने उतू जाणे हा मेंढरांचे दूध त्याची उतू जाण्याची क्रिया व रागाची क्रिया यांचा संबंध घेऊन प्रादेशिक भाषेत माडगूळकर राग व्यक्त करतात

अशा प्रकारे माडगूळकरांनी आपल्या "बनगरवाडी" कादंबरीत स्वभावानुरूप प्रादेशिक भाषा वापरल्याने ती नैसर्गिक वाटते म्हणूनच प्रा. त्र्यं.शं. शेजवलकर लिहितात--"बनगरवाडी" मध्ये महाराष्ट्र भाषा सुंदरी रानाफुलांनी शृंगारलेल्या खेडवळ मुलीच्या स्वरूपात उभी असून तिचे स्वरूप मनात ठसण्यासारखे उमटले आहे."[१७]

या स्वभावानुरूप भाषेचा आणखी प्रत्यय या कादंबरीतील शिव्या आहेत. त्यातून राग, तिरस्कार यांचा प्रत्यय येतो.

शिव्यातून व्यक्त होणाऱ्या भावछटा- प्रादेशिक कादंबरीत निवेदन व संवाद यातून जी बोली आपली रूपे दाखविते त्यात बऱ्याचदा शिव्या असतात. या शिव्या राग लोभाच्या छटा दाखवित असतात. उदा. अंजी-मास्तर यांचे लफडे आहे अशी अफवा बालटया मुद्दाम गावात पसरतो व कारभारीही मास्तराशी बोलत नाही तेव्हा अंजी मास्तरला म्हणते "त्या भाडया दाण्यानं कायतरी सांगटलंय म्हाता-याला" इथे 'भाडया' या शिवीतून तिचा राग व्यक्त होतो. आनंदा रामोशाच्या वागण्याबद्दलही लोक शिव्या घालतात. तिथे लोकप्रक्षोभाची भावना दिसते.

अंजीबद्दलचा गैरसमज दूर करताना मास्तर कारभाऱ्याला म्हणतो--
"असा नालायक माणूस नाही मी"
बालटयाला अंधारात मारल्यावर रामा म्हणतो-- "या भडव्याच्या हजार भानगडी. कुणी परगावच्या मानसांनी मारलं असलं तर काय पत्ता लागणार ?"

आयबु तुच्छपणे बोलला "त्यो काय नरपुडा करतोय"
"निव्वळ भंपक हाय वाणी अशानं भिकारी होऊन बसंल !"
"तिला घेऊन काय कापायची ? जगान्या पाहिजे. अशा प्रकारे भाडया, नालायक, भडवा, भपंक, नरपुडा, कापणे या तुच्छतादर्शक शब्दातून माणसाचे वागणे त्याचा स्वभाव सहजपणे कळून येतो.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

वाक्प्रचार-म्हणींचा वापर-

बनगरवाडी कादंबरीतील वाक्प्रचार म्हणी यातून सत्य, लोकव्यवहार, प्रादेशिक समज, रूढी परंपरा यांचा प्रत्यय येतो. तो त्या प्रादेशिक जीवनाच भागच असतो.

उदा- "चोराच्या वाटाचोराला ठाव्या", "धनगरी वेड सहा महिने जाणार नाही" यातून मेंढरांची चोरी, धनगरी माणसाचे वेड कसे असते याचा संबंध त्या प्रदेशातील मेंढरे व मेंढपाळ यासी आल्याने ती प्रादेशिकताच व्यक्त करते. तसे "तेगार नसणे" काठी बसणे" "नरडे फोडणे" या वाक् प्रचारातूनही मेंढराचे जीव मेंढपाळचे जीवन. "नरडे फोडणे" यातून लांडगा व मेंढरू याचा संबंध, काठीचा व मेंढराच्या खांडाचा संबंध हा अन्योन्य संबंध आहे व तो प्रादेशिक आहे हे वाक्प्रचार जिथे मेंढरे नाहीत तिथे फारसे वापरात नसतात. या शिवाय जवळ जवळ ५०-५५ वाक्प्रचार व म्हणी या कादंबरीत आहेत. पण प्रादेशिकता व्यक्त होणाऱ्या या खास वाक्प्रचार, म्हणी आहेत.

उपमांचा समर्पक उपयोग:

म्हणी वाक्प्रचाराप्रमाणेच "बनगरवाडी"त अनेक उपमांचा वापर माडगूळकरांनी केलेला आहे. परंतु ज्या उपमातून प्रादेशिकता दिसून येते त्या उपमा म्हणजे --

१) तापलेल्या कोंबड्यासारखा मी तिच्यात बसलो.

२) चुकले मेंढरु न्हालावे तसे न्याहाळले.

३) पावसाने भिजणाऱ्या कुत्र्यासारखा आत येऊन बसणारा हा आयबु कोण ?

४) माझा आवाज घाबरलेल्या मेंढरासारखा आला होता.

५) कुत्र्याला यावा तसा लांडग्याचा वास त्याला येत असे.

६) बैल घोडा जसा बसल्या बसल्या झोप घेतो तसा हा म्हातारा बसल्या बसल्या झोप घेई.

७) मेलेले बकरे उचलावे तसे त्याने बालट्याला उचलले.

८) स्वच्छ अंघोळ करून, केस नीट विचरून अंगभर कपडे घातलेल्या धनगराच्या पोरीसारखी वाडी दिसू लागली.

या म्हणीतून धनगर-मेंढरे-कुत्री-लांडगे-कोंबडया-घोडा बैल हे धनगराचे जग. यांच्याशी त्याचा सतत संपर्क म्हणून त्यांच्या बोलण्यातून त्याचविषयीच्या उपमा माडगूळकर सहजपणाने घालतात. त्यामुळे माणूस आपल्या धंद्यातील शब्दांच्याच उपमा जसा स्वाभाविक देतो. तशा या आहेत. या उपमा या प्रादेशिक वैशिष्टयातून आलेल्या आहेत. कारण ही "बनगरवाडी" ज्या माळरानावर आहे. तिथे उगवणारे खुरटे गवत ते खाऊन जगणारी मेंढरं व त्यांच्या जीवावर जगणारे मेंढपाळ यामुळे हा भाषिक परिणाम त्या प्रदेशाचा आहे. व तो स्वाभाविक आहे. म्हणूनच त्यांच्या भाषेला सहजपणे प्रकट करणारे माडगूळकर म्हणजे ती लोकभाषा लीलया राबवणारे साहित्य सृष्टीतील एक विक्रमवीर आहेत.

ध्वन्यनुकारी शब्दांची योजना:

प्रादेशिक कादंबरीत ध्वनिचित्रणाबाबत डॉ. मदन मुलकर्णी लिहितात- "प्रादेशिक कादंबरीतील भाषेच्या स्वरूपाचा विचार करताना त्यातील ध्वनि-चित्रणाकडे अवधान द्यावे लागेल. असे ध्वनि-चित्रण किंवा लोक ध्वनि इतर कोणत्याही कादंबरीप्रकारात आढळत नाहीत. वातावरण निर्मितीसाठी भाषेचा उपयोग होतो, त्यातही ध्वनि-चित्रणामुळे वातावरण निर्मितीचे

भाषेचे सामर्थ्य वाढत असते."[१८]

माडगूळकरानी "बनगरवाडी"त अशी ध्वनि-चित्रणे हेतुपुरस्सर केलेली नाहीत. तर ती प्रादेशिकतेचा अविभाज्य अंग म्हणूनच आली आहे. उदा. "बनगरवाडी" ही धनगरांची वस्ती. इथले धनगर साहजिक त्यांची मेंढरे. ती चरायला सोडताना, चरून परत येताना. कोंडवाडयात कोकरांचा-मेंढरांचा होणार बे.बे. मे-मेचा आवाज, एकटेच मेंढरू राहिले तर त्याचे बें-बें ओरडणे. मेंढया हाकताना हा-हा तोंडाने आवाज करने, मेंढरे व लुचणारी पोरे, त्यावेळी त्यांच्या तोंडाचा दूध पिताना होणारा "मचमच" आवाज, खाली मान घालून फुर्रफुर्र करीत जाणारा मेंढरांचा कळप. हे जसे ध्वनी मेंढपाळाचे जग सजग करतात. तसेच मेंढरे चारून कंठाळलेले धनगर करमणुकीसाठी गजी नृत्य करतात तेव्हा ढोलाचा होणारा ड्डिबांग-डीपांग - डीचीबाडी - डीपांग -डी-बाडी- डीबांग - डीपांग - डीपांग - डीपांग होणारा ध्वनिसुध्दा वास्तवचित्र रेखाटणारा आहे. या मेंढरांच्या व ढोलांच्या ध्वन्यानुकारी शब्दयोजनेमुळे माणदेश मधील मेंढपाळची वस्ती आपल्या डोळयापुढे उभी करण्याची किमया माडगूळकरांनी सहज साधली आहे. त्यात कुठेही कृत्रिमता नाही. तर त्यात अस्सल प्रादेशिकताच आहे.

शब्दयोजनेतील प्रादेशिक वैशिष्टय:

विशिष्ट भू प्रदेशात विशिष्ट प्रकारच्या शब्दाचाच वापर मोठया प्रमाणात होतो. त्यामुळे तो प्रदेश डोळयापुढे उभा राहतो. उदा. कोकण म्हटले की, माड, सागर, मात, मासे, साकव या सारखे वा त्या संदर्भातलेच शब्द येतात.

त्याच प्रमाणे माडगूळकरांनी मेंढपाळाच्या जीवनाशी संबध्द असणारे

नाविण्यपूर्ण शब्द वापरले आहेत.
उदा- पाव्हणा थोडा कानपला इथे दूध कानपणे या शब्द प्रयोगाशी साम्य आहे. व्हलगाडणे शब्द लांडगा व मेंढरु या संबंधातील आहे. तसेच मेंढरांच्या संबंधातील - डंरगाळणे, खांड, लेकुरवाळया, डालपाठी, (मेंढराची पिले डालण्याची पाटी) लुचणे. इ. शब्द प्रादेशिक वैशिष्टय दर्शविणारे आहेत. पण माडगूळकरांच्या या शब्दासाठी शब्दकोश धुंडाळण्याची गरज वाटत नाही. कारण ते शब्द माडगूळकर खुबीने वापरतात. माडगूळकरांनी संवादासाठी जी प्रादेशिक बोली वापरली त्याबद्दल श्री. ना. गो. कालेलकर म्हणतात - "सर्वांग चित्रणाच्या दृष्टीने भाषा हे एक अपरिहार्य अंग ठरते..... "बनगरवाडी" तील कारभारी, किंवा आनंदा रामोशी व इतरपात्रे जर व्याकरण शुध्द बोलू लागल निसर्ग-वर्णनाचे जे तंत्र लेखकाने त्यात अवलंबिले आहे, ते टाकून ठोकळ वर्णनावर भागवले तर काय हाती येईल याची कल्पनाच केलेली बरी."[१९] म्हणूनच माडगूळ-करांनी जाणीवपूर्वक ही प्रादेशिक बोली-संवादासाठी वापरली. ही बोली चित्रमय, ओघवती, "बनगरवाडी"च्या मातीचे गुणधर्म जन्माला घेऊन आलेली. नादमय व प्रवाही आहे.

माडगूळकरांच्या लेखनाचे वेगळेपण:

"बनगरवाडी"तील मेंढपाळाचे विश्व हे गबाळे, गलिच्छ, नागर संस्कृतीचा स्पर्श न झालेले आहे. ही बनगरवाडी नकाशात कुठेही नाही पण तिचे विश्व उभे करताना माडगूळकरांनी आपल्या लेखणीची सारी वैशिष्टये "पणाला" लावली आहेत. या कादंबरीचे लेखनच वेगळे असल्याने प्रादेशिक कादंबरीच्या तुलनेत चटकन डोळयात भरते. "माडगूळकर आपल्या लेखनात शब्द, वाक्य, विचार सांकेतिक पध्दतीने आणीत नाहीत तर ते मातीच्या अनुभवाने त्यांची भाषा मातीशी एकरुप पावते. हे संस्कार इतके प्रभावी की, त्या मातीपासून भाषा

अलग करताच येत नाही. उदा. पिंढीरी एवढा पाय जाईल अशा भेगा. "दांगुळया पायाची मेंढरं", "बुचडयाचा खाया" थटलेली पेरणी, मुंडा हात उंच बायको या शब्द प्रयोगातून जेवढया सहजतेने करतात. तेवढेच मास्तराच्या अवलोकनातून चांदणी रात्र, पावसाळा, सुगी, खेळ, यांची वर्णने त्या मेंढपाळ जीवनाशी एकरूप होऊन जातात.

तर कधी "मास्तर, आलं आमचं खुळं माघारी." यातून निर्माण होणारा बोचरा विनोद, माडगूळकर सहज व्यक्त करतात. अर्थात इथे विनोद निर्मितीचा हेतू नाही.

या "बनगरवाडी"चे जग सजग करताना मास्तर, अंजी, कारभारी, बालटया, आनंदा रामोशी, आयबू, नानी यांची चित्रमाला माडगूळकर नेमक्या शब्दात उभी करतात. तर कधी मेंढवाडयातील विष्ठा, मुताचा, लेंडयाचा उग्र दर्प भाषेला जाणवतो. तर कधी पशू, पक्षी, मेंढरे यांच्या आवाजाचा कोलाहल उडून जातो. छोटया छोटया वाक्यात, नेमक्या शब्दात हे मेंढपाळाचे जग उभे करताना लेखक कुठेही जाणवत नाही. आपण एखादे स्वप्न पहावे आणि त्यात हरवून जावे तसे होते. व शेवटी निसर्गाच्या उग्र रूपाचे (दुष्काळाचे) दर्शन घडताच मनाला हुरहूर लागून राहते. म्हणूनच "बनगरवाडी" म्हणजे प्रादेशिक हया शब्दाचा संपूर्ण अर्थ लागू पडेल अशी छोटी-तरीही फार मोठी कादंबरी होय"[२०] असे ल.ग. जोग म्हणतात ते खरे आहे.

सारांश- "बनगरवाडी"च्या आधीच्या कादंबऱ्यातील भाषा ही सहेतुकपणे वापरलेली ललित वाङ्मयाची भाषा आहे. माडगूळकरांनी आपली भाषा साहित्य भाषेच्या या कृत्रिम संकेतापासून दूर ठेवली. त्यांनी निवेदनासाठी वर्णनासाठी नागर भाषेचा प्राधान्याने उपयोग केला खरा, मात्र तो करताना अधुनमधून

प्रादेशिक भाषेतील शब्द अत्यंत प्रभावीपणे व वाचकांना संदर्भाने सहजच अर्थ कळेल अशा पध्दतीने वापरले. संवादासाठी तर सर्रासपणे ग्रामीण लोकांच्या बोलीचा उपयोग करुन त्यांचे अंतरंग प्रभावीपणे आविष्कृत केले. व्यंकटेश माडगूळकरांच्या भाषाविषयक कामगिरीचे वर्णन करताना डॉ. गो.मा. पवार लिहितात, "केवळ साहित्यिक प्रमाण मराठी भाषेचा सराव असणा-या वाचकांना ग्रामीण बोलीचा क्रमशः परिचय करुन देऊन साहित्यिक भाषा व ग्रामीण बोली यांच्यामध्ये पूल बांधण्याचे महत्त्वाचे कार्य माडगूळकरांनी केले व साहित्यिक भाषेला बोलीकडे उन्मुख केले."[२१] ललित साहित्य आणि भाषा यांच्यामध्ये असलेला कृत्रिमतेचा अडसर माडगूळकरांनी दूर केला व साक्षात लोकजीवनाला भिडणारी प्रादेशिकतेची वैशिष्टये असणारी भाषा त्यांनी वापरली व तिचे सामर्थ्य प्रत्ययाला आणून या भाषेला साहित्य भाषेचा दर्जा प्राप्त करुन दिले. भाषा वापराबाबत माडगूळकरांची ही कामगिरी "बनगरवाडी"मध्ये विशेषत्वाने प्रत्ययाला येते.

•••••

संदर्भ

१. डॉ. मदन कुलकर्णी- "मराठी प्रादेशिक कादंबरी: तंत्र आणि स्वरूप" मंगेश प्रकाशन नागपूर, पृ. २३०.

२. "बनगरवाडी" आवृत्ती १०, मौज प्रकाशनगृह, मुंबई, पृ. ४

३. तत्रैव - पृ. ४

४. तत्रैव - पृ. ५

५. तत्रैव - पृ. ९७

६. तत्रैव - पृ. ५

७. तत्रैव - पृ. ८३

८. तत्रैव - पृ. ८५

९. तत्रैव - पृ. ८९

१०. तत्रैव - पृ. ७७

११. तत्रैव - पृ. ७८

१२. तत्रैव - पृ. १५

१३. तत्रैव - पृ. ३१

१४. तत्रैव - पृ. ७४

१५. तत्रैव - पृ. ९९

१६. तत्रैव - पृ. ९७

१७. प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर, "नवभारत", सप्टेंबर/आक्टोबर, १९५५,५६.

१८. डॉ. मदन कुलकर्णी, मराठी प्रादेशिक कादंबरी: तंत्र आणि स्वरूप, मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. २६२.

१९. ना.गो. कालेलकर, "ग्रामीण साहित्यातील भाषा" म.सा. पत्रिका, एप्रिल/मे/जून, १९६१.

२०. ल.ग. जोग - 'कादंबरी' चिरंजीव ग्रंथ प्रकाशन, पुणे-२, पृ. ११७.

२१. डॉ. गो.मा. पवार- साहित्यातील प्रादेशिकता- भाषा आणि निवेदन,
"मराठी साहित्यातील प्रादेशिकता पैलू आणि प्रश्न"
परिसंवाद, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२८/२९ डिसेंबर, १९८७.

.....